**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे**
**(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)**
**मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१**

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स ०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) - २०१९

जाहिरात क्रमांक: /२०१९

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक, सामाजिक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणासाठी १०७ वर्षापूर्वी सन १९१३ साली कोलंबिया येथे प्रस्थान केले होते. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बार्टी मार्फत सन २०१३ पासून "डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)" सुरु करण्यात आली. त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधना करिता प्रोत्साहन व आर्थिक सहाय्याच्या स्वरुपात अधिछात्रवृती देण्याकरिता ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहे.

**अधिछात्रवृत्ती संख्या व आरक्षण:-**

| प्रवर्ग | एकूण जागा |
|---|---|
| दिव्यांग (५ %) | ०५ |
| महिला (३०%) | ३२ |
| सर्वसाधारण पुरुष व महिला | ६९ |
| **एकूण संख्या** | **१०६** |

**पात्रता निकष:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी व अनुसूचित जातीचाअसावा.
२. अर्जदार हा NIRF(National Institute of Ranking Framework) ने २०१९ करिता जाहीर केलेल्या देशातील पहिल्या १०० विद्यापीठातील नोंदणीकृत विद्यार्थी असावा.
३. दिनांक: ०१,जानेवारी २०१९ ते ३१,डिसेंबर २०१९ दरम्यान संबंधित विद्यापीठामध्ये पीएच.डी करिता नोंदणी असलेले विद्यार्थी अधिछात्रवृत्ती साठी ऑनलाइन अर्ज करू शकतात.
४. अर्जदाराने पीएच.डी. च्या नोंदणी दिनांकापासून खाजगी, शासकीय व इतर कोठेही पूर्ण/अर्ध वेळ नोकरीच्या स्वरुपात तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करून आर्थिक उत्पन्नाचा लाभ घेतलेला नसावा/घेत नसावा किंवा अर्थाजन केलेले नसावे/करत नसावे.
५. अर्जदाराने कोणतीही भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती किंवा इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा/घेत नसावा.

**(मार्गदर्शक तत्वे** (BANRF-19 Guideline) **बार्टीच्या https://barti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत)**

**अधिछात्रवृत्ती अंतर्गत देण्यात येणारे लाभ:-**

१) निवड करण्यात येणाऱ्या अर्जदारांना पीएच.डी करिता Junior research fellowship (JRF) प्रति महा रु.३१,०००/- प्रमाणे व Senior research fellowship (SRF) करिता प्रति महा रु.३५,०००/- याप्रमाणे अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात येणार आहे.
२) शासकीय नियमानुसार घरभाडेभत्ता, आकस्मित खर्च इ. बार्टी मार्फत देण्यात येणार आहेत.

**अटी व शर्ती:-**

१. अधिछात्रवृत्ती BANRF-२०१९ करिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती अंतर्गत दिले जाणारे सर्वलाभ संबंधित विद्यापीठ / संस्था यामध्ये नोंदणी / रुजू दिनांकापासून (Registration Date) लागू होतील.
२. प्रस्तुत BANRF-२०१९ करिता फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

३. विद्यापीठात नोंदणीकृत नसलेले अर्जदार व या अगोदर बार्टी अधिछात्रवृत्ती अंतर्गत लाभ घेतला असल्यास **BANRF-२०१९ करिता अर्ज करण्यास पात्र नसतील.**

४. **अर्जदार यांनी वेब-बेस्ड(Web Based) ऑनलाइन अर्ज** https://barti.maharashtra.gov.in>Notice Board>Online Application BANRF- २०१९ या वेबसाइटवर

**किंवा**

**बार्टीच्या मोबाईल अॅप्लीकेशन** (e-BARTI) वर(e-BARTI Android app>Registration>m-Governance>Fellowship) **दिनांक:१५/०२/२०२१,रात्रौ ००:०१ वा.ते दि.१५/०३/२०२१, रात्रौ २३:५९ वाजेपर्यंत** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

५. अर्जादारांकरिता ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना, मार्गदर्शक तत्वे बार्टीच्या https://barti.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धआहेत.

६. बार्टीस ऑनलाइन अर्ज सादर करताना खोटी माहिती सादर केल्यास प्रस्तुत BANRF-२०१९ व यापुढील सर्व निवड प्रक्रीयेसाठी अर्जदारास अपात्र ठरविण्यात येईल.

७. वर नमूद केलेल्या अधिछात्रवृत्ती संख्या व आरक्षण,अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे संपूर्ण अंतिम अधिकार महासंचालक, बार्टी यांनी राखून ठेवलेले आहेत.

८. ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १८००२३३०४४४ (सकाळी ०८:०० ते रात्रौ १०:०० वाजेपर्यंत) / ईमेल – fellowship.information@gmail.com वर संपर्क साधावा.

**धम्मज्योती गजभिये(IPoS)**
**महासंचालक**

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: २७/०१/२०२१**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.**